पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दुसरा कॉल

शिवाजी विद्यापीठ परिसरातील वाळलेली व उन्मळून पडलेली झाडे तोडून व वाहतूक करुन विकत नेण्याची आहेत. त्यासाठी इच्छुक खरेदीदारांकडून दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १ | शिवाजी विद्यापीठ परिसरातील वाळलेली व उन्मळून पडलेली झाडे तोडून व वाहतूक करुन विकत नेणे. |

दरपत्रके कार्यालयीन वेळेत दिनांक ३०/०८/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत भरावीत. अधिक माहितीसाठी उद्यान कार्यालयाशी संपर्क साधावा. कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

**उद्यान विभाग**
**दिनांक २१/०८/२०२१**

**डॉ.व्ही.डी.नांदवडेकर**
**कुलसचिव**

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दुसरा कॉल

शिवाजी विद्यापीठ परिसरातील वाळलेली व उन्मळून पडलेली झाडे तोडून व वाहतूक करुन विकत नेण्याची आहेत. त्यासाठी इच्छुक खरेदीदारांकडून दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| १ | शिवाजी विद्यापीठ परिसरातील वाळलेली व उन्मळून पडलेली झाडे तोडून व वाहतूक करून विकत नेणे. |

दरपत्रके कार्यालयीन वेळेत दिनांक ३०/०८/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत भरावीत. अधिक माहितीसाठी उद्यान कार्यालयाशी संपर्क साधावा. कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

उद्यान विभाग
दिनांक : २१/०८/२०२१

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव

सकाळ

# उमेश गडेकर यांना पीएच.डी.



उमेश गडेकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमधील सहायक संचालक उमेश गडेकर यांना समाजकार्य विषयात मुंबई विद्यापीठाची पीएच.डी. मिळाली. त्यांनी 'खासगी सूक्ष्म वित्तीय संस्था आणि गरिबी निर्मूलन' विषयावर शोधप्रबंध सादर केला. दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी खासगी सूक्ष्म वित्तीय संस्था मोलाची भूमिका बजावतात, असा निष्कर्ष संशोधनात काढला. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्याचा त्यांनी विशेष अभ्यास केला आहे. त्याना संशोधनासाठी मुंबई विद्यापीठातील राजीव गांधी समकालीन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. बालाजी केंद्रे, डॉ. चंद्रकांत पुरी यांचे मार्गदर्शन मिळाले.

21 AUG 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहाजी महाविद्यालयात दरवर्षी ४ हजार विद्यार्थ्यांना शिक्षण

## आज महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सवी वर्ष सांगता समारंभ

**कोल्हापूरच्या दसरा चौकातील श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयास ५० वर्षे पूर्ण होत आहेत. महाविद्यालयातून आतापर्यंत दीड लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेतले असून, दरवर्षी चार हजारांवर विद्यार्थी कला, वाणिज्य, विज्ञान शाखांमधून उच्च माध्यमिक, पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत आहेत. या ५० वर्षांत शहाजी महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे त्यानिमित्त...**



शहाजी महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले भारतीय परराष्ट्र सेवेतील माजी परराष्ट्र सचिव व अनेक देशांमध्ये राजदूत म्हणून काम केलेले ज्ञानेश्वर मुळे, आयएएस अधिकारी भूषण गगराणी, विलास पाटील यांच्यासह विविध क्षेत्रात हजारो विद्यार्थी चमकले आहेत. याचे श्रेय छत्रपती शाहू महाराज, श्री शहाजी छत्रपती महाराज, माजी कृषी राज्यमंत्री श्रीपतराव बोंद्रे, या संस्थेची ज्यांनी ज्यांनी धुरा सांभाळली त्या संस्था पदाधिकाऱ्यांना जाते. महाविद्यालयास नामांकित प्राचार्य, प्राध्यापकांची टीम लाभली. यामध्ये १९७१ ते १९७३ पर्यंत प्राचार्य एस. एस. भोसले, १९७३ ते १९७४ प्राचार्य एम. एच. कदम, १९७४ ते १९८० प्राचार्य डॉ. आबासाहेब शिंदे, १९८१ ते १९९७ पर्यंत प्राचार्य डॉ. व्ही. डी. कटांबळे, १९९७ ते २०१७ पर्यंत प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांचे प्राचार्य म्हणून उत्तम नेतृत्व लाभले. गेल्या साडेतीन वर्षांपासून प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण प्राचार्य म्हणून उत्तम काम करीत आहेत. त्यांनी दीडशेहून अधिक नवे उपक्रम राबवले आहेत. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे, आमदार पी. एन. पाटील यांचे त्यांना प्रोत्साहन व मार्गदर्शन आहे.

महाविद्यालयात कला, वाणिज्य शाखेतून उच्च माध्यमिक शिक्षण, कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतून पदवी शिक्षण, वाणिज्य शाखेतून पदव्युत्तर शिक्षण व ११ व्यावसायिक प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू आहेत. शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण विभागाचे आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विविध अभ्यासक्रमही सुरू आहेत.

### यशवंतराव चव्हाण सभागृहात सांगता समारंभ

शनिवार २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता या महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सवी वर्ष सांगता समारंभ श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चिफ पेट्रन शाहू छत्रपती महाराज, आमदार पी. एन. पाटील-सडोलीकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण, सभागृहात संपन्न होत आहे.

महाविद्यालयात ८१ हजारांवर समृद्ध ग्रंथांचे संग्रह आहे. डॉ. पी. बी. पाटील ग्रंथपाल हे विद्यार्थ्यांना अखंडपणे मार्गदर्शन करतात. क्रीडा प्राध्यापक प्रा. प्रशांत पाटील यांनी महाविद्यालयास तीनदा मेघनाथ नाकेशकर ट्रॉफी खेळामध्ये मिळवून दिली आहे. श्रीपतराव बोंद्रे दादा स्पर्धा परीक्षा सेंटरही प्रा. डॉ. विजय देठे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. रवींद्र भोसले प्रबंधक, मनीष भोसले अधीक्षक यांची साथ आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचाराने आणि स्व. श्रीपतराव बोंद्रे यांनी दाखवलेल्या मार्गाने या महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

**- डॉ. पांडुरंग पाटील, ग्रंथपाल**
**श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय**